# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN: U४५२००MH१९७४SGC०१७२०६

पंजि. कार्या. : एफडीसीएम भवन, ३५९/ बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४० ०३६.

Website : www.fdcm.nic.in/Email:md@fdcm.nic.in/mdfdcmltd@gmail.comcgmfdcm@gmail.com


क्र.कक्ष-आस्था-१/प्रक्र.२६७ /न.क्र.२२५/२०२३-२४/३०१० नागपूर,दिनांक:-७ डिसेंबर, २०२३

## परिपत्रक

**विषय:- कर्तव्यावर अनधिकृतरित्या अनुपस्थितीबाबत.**

**संदर्भ:-** या कार्यालयाकडील ज्ञापन क्रमांक कक्ष-आस्था-१/प्रक्र.२६७ /न.क्र.२२५/-परिपत्रक २०२३-२४/३००६ दिनांक ५ डिसेंबर, २०२३

या कार्यालयाचे निर्देशनास आले आहे की, एफडीसीएमचे काही अधिकारी/कर्मचारी ७ व्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१/०१/२०१६ ते ३०/०६/२०२१ या कालावधीची थकबाकी मिळणेकरिता ४ डिसेंबर २०२३ पासून संपावर आहेत. उक्त दिनांकापासून अशा अधिकारी/कर्मचारी त्यांच्या वरिष्ठांच्या पुर्वपरवानगी शिवाय अनधिकृतरित्या अनुपस्थित आहेत.

२.०० या संबंधी सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येते की, शासनाने दिनांक ०१/०७/२०२१ पासून एफडीसीएम साठी ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मंजुर केले असून दिनांक ०१/०१/२०१६ ते ३०/०६/२०२१ या कालावधीची थकबाकी संबंधी निर्णय घेण्यासंदर्भात मंत्रीमंडळ उपसमिती गठीत केलेली आहे. सदर वस्तुस्थिती सर्व संबंधितांना विदितच असेल. सबब उक्त कारणामुळे संपात सहभागी होणे अनाठायी ठरते.

३.०० उक्त पार्श्वभूमीत, कर्तव्यावर अनधिकृतरित्या अनुपस्थित असलेल्या एफडीसीएमच्या सर्व अधिकारी/कर्मचा-यांचे लक्ष FDCM Employees Conduct and Discipline Rules मधील खालील नियमांकडे पुन्हा वेधण्यात येत आहे.

**नियम (५)** An employee shall at all times maintain absolute integrity and devotion to duty. He shall serve the Corporation honestly and faithfully and shall endeavor to promote the interest of the Corporation......

**नियम (८)** (१) Except in the case of sudden illness or unforeseen circumstances no employee shall remain absent from duty or leave his head quarter without the prior written permission of his immediate superior officer.

**नियम (१३)**(i) No employee shall take an active part in political demonstrations nor movements subversive of the Corporation or of the Government ......

४.०० उक्त वैधानिक तरतुदीनुसार उपरोल्लेखित संपात एफडीसीएमचे अधिकारी/कर्मचारी यांनी घेत असलेला सहभाग पूर्णत: बेजबाबदारपणाचा अणि शिस्तविषयक नियमांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करणारा ठरतो. या नियमांचे उल्लंघन करणारे सर्व अधिकारी/ कर्मचारी FDCM Employees Service (Discipline & Appeal) Rules मधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र ठरतात. शिक्षेमुळे पदोन्नती तर प्रभावित होतेच, शिवाय संपात व्यतीत केलेला कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून ठरवला जाण्यासाठी पात्र असून तत्पुर्वीची सेवा समपृहत (Forfeiture) होण्यास पात्र ठरते. याव्यतिरिक्त उक्त अनधिकृत अनुपस्थितीकडे शासकीय वनसंपदेचा किवां कंपनीच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास, संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांकडून अशी नुकसानी वसूलपात्र ठरेल.

५.०० संपामुळे तसेच अनधिकृत अनुपस्थिती व कामबंदमुळे उद्भवणारे उपरोक्त सर्व परिणामांकडे सर्व अधिकारी/कर्मचा-यांचे लक्ष संदर्भिय ज्ञापनाद्वारे यापूर्वीच वेधण्यात आले असून उक्त बाबींकडे पुन्हा लक्ष वेधण्यात येत आहे.

(संजीव गौड)
महाव्यवस्थापक (मुख्यालय)

प्रति,
प्रादेशिक व्यवस्थापक (सर्व)
विभागीय व्यवस्थापक (सर्व)
मुख्यालयातील सर्व कक्ष अधिकारी
एफडीसीएम मधील सर्व अधिकारी/कर्मचारी

प्रतिलीपी:- प्रधान सचिव (वने) महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

प्रतिलीपी:- एफडीसीएमचे अधिकृत संकेत स्थळ www.fdcm.nic.in